36829-2010

ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal

**UGC-CARE LISTED**

## Folk Literature & Folk Media

FEBRUARY 2020













Executive Editor : Dr. Subash Nikam

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)

Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

Scanned by CamScanner

NI : MAHMAR - 36829-2010 ISSN – 2229-4929

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

February - 2020

## Folk Literature & Folk Media

Executive Editor
Dr. Subhash Nikam
Principal
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College, Nimgaon,
Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA

Co-Editors
Assisst Prof Arjun G. Nerkar
Dr. Kalyan S. Kokane
Dr. V. D. Suryawanshi

Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR,

DIST. LATUR,-433515, MAHARASHTRA

**Published by –** Dr. Subhash Nikam, Principal, KBH College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nahik, MS

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The authosr shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors Price: Rs. 1000/-



Scanned by CamScanner

**Mahatma Gandhi Vidyamandir's**

**Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science and Commerce College**
**Nimgaon, Tal. Malegaon, Dist.-Nasik [M.S.] India- 423212**

# National Conference on Folk Literature & Folk Media

**13th & 14th February 2020**

**Sponsored By**
**Savitribai Phule Pune University, Pune**

**Convener**
**Prin. Dr. Subhash Nikam**

**Co-ordinator**
**Prof. Arjun G. Nerkar**

**http://kbhnimgaoncollege.com**



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 33 | लोकसाहित्य आणि संस्कृती<br>प्रा. डॉ. माने हनुमंत तुकाराम | 137-139 |
| 34 | लोकसाहित्य आणि संस्कृती<br>डॉ. मनिषा दौलतराव सोनवणे | 140-142 |
| 35 | मौखिक स्त्री गीते<br>प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील | 143-145 |
| 36 | लोकसाहित्य संस्कृती<br>प्रा.डॉ. मोहन श्रीरंग कांबळे | 146-147 |
| 37 | **लोकसाहित्यातील प्रमुख भटक्या विमुक्तांच्या योगदानाचा अभ्यास**<br>प्रा. अंबादास नरसिंगराव पाचंगे | 148-150 |
| 38 | महाराष्ट्रातील लोकगीत आणि लोककला प्रकार.<br>प्रा.पंकज पवार | 151-152 |
| 39 | **लोकगीते : संकल्पना, स्वरूप व वर्गीकरण**<br>डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे | 153-156 |
| 40 | ''लोकसंगीत''<br>प्रा. अशोक एस. जाधव | 157-158 |
| 41 | लोकसाहित्य आणि भारतीय लोककथा<br>प्रा.डॉ.राजेंद्र रामकृष्ण सांगळे | 159-162 |
| 42 | लोकसाहित्य<br>डॉ. रंजना बाळासाहेब पाटील | 163-166 |
| 43 | भारतीय लोककथेची परंपरा<br>डॉ. युवराज देवबा भामरे | 167-169 |
| 44 | आधुनिक कलांमधील लोकाविष्काराचे दर्शन – स्वरूप विवेचन<br>प्रा. डॉ. संभाजी आण्णू शिंदे. | 170-174 |
| 45 | खानदेश लोकसाहित्यातील 'सण–उत्सव' परंपरा<br>डॉ. संजय रतन खैरनार | 175-178 |
| 46 | **लोककथेतील समाजदर्शन**<br>प्रा. डॉ. शशिकला बबनराव पवार | 179-181 |
| 47 | लोकसाहित्य आणि संस्कृती<br>डॉ. सपना वाल्मिक सोनवणे | 182-184 |
| 48 | भिल्ल लोकसंस्कृतिचा खानदेशी अविष्कार<br>प्रा.विद्या सुर्वे बोरसे | 185-187 |
| 49 | लोकसाहित्य आणि लोकमाध्यमे<br>प्रा. वैशाली गिरधर पाटील | 188-191 |
| 50 | लोकगीतातील सामाजिक आणि सांस्कृतिक दर्शन<br>प्रा. वृषाली सोपान उगले, | 192-195 |
| 51 | लोकसाहित्य आणि समाज जीवन<br>प्रा. हिरा त्र्यंबक वाघ | 196-199 |




Scanned by CamScanner

ISSN : 2229-4929
February - 2020

# लोकसाहित्य आणि संस्कृती

**डॉ. सपना वाल्मिक सोनवणे**
म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, जि. नाशिक

संस्कृती म्हणजे इतिहासातून निष्पन्न झालेला जीवनाचा एक आकृतीबंध सुसंस्कृत जीवनात बाह्य समृध्दीसोबत मन, बुध्दी अन पंचेंद्रिये यांच्यावरही नियंत्रण असावे लागते. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करण्याच्या प्रक्रियेलाच संस्कृती म्हणता येईल. लोकसाहित्य हे लोकांचे लोकांनीच निर्माण केलेले साहित्य असते. त्यात लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब असते. लोकसाहित्य हे त्या त्या देशाचा सांस्कृतिक ऐवज किंवा संचित असते. लोकसाहित्याच्या जडण–घडणीत लोकजीवनाच्या महत्त्वाचा वाटा असल्याने लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा परस्परसंबंध अतुट असतो. शहरापेक्षा ग्रामीण लोकजीवनात लोकसाहित्याची सामुग्री अधिक प्रमाणात उपलब्ध होत असते. लोकसाहित्याला परंपरा असते. ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. लोकसाहित्याची निर्मिती समाजाच्या सर्व स्तरातून होत असते. त्याच्या मुळाशी समुह मनाच्या धर्मश्रध्दा असतात. त्याचमुळे लोकसाहित्याचे पिढ्यानुपिढ्या संक्रमण व संवर्धन होते. लोकसाहित्याच्या निर्मितीवर निर्मात्याची नाममुद्रा नसते. त्याच्यावर त्या समुहाची मालकी असते म्हणून त्याची उपयुक्तता सार्वत्रिक जाणवते. समाजव्यवस्था हीच निर्माती व संस्कारकर्ती असते. लोकसाहित्याच्या विचारात जनतेच्या मनाचा अविष्कार दिसतो. मानवी जीवनाच्या संस्कृतीच्या वाटचालीतल्या अनुभवाचे ठसे लोकसाहित्यात सातत्याने प्रतिबिंबीत होतांना दिसतात.

सामाजिक जीवनात प्रत्येक व्यक्ती परंपरांची जोपासना करीत असते. रुढी–परंपरा, सण–उत्सव इ. द्वारा परंपरांची अभिव्यक्ती होत असते. यामध्ये दोन हेतु साध्य होत असतात. एक तर सामाजिक संबंध जोपासले जातात. तर दुसरा हेतु म्हणजे दैनंदिन जीवनामध्ये आनंदनिर्मिती होय. सांस्कृतिक जीवनाचे व लोकसाहित्याचे जवळचे नाते आहे. सांस्कृतिक जीवनातील करमणूक छंद, खेळ, फावल्या वेळेचे उपाय, वैयक्तीक व सामूहिक सुखप्राप्तीचे प्रयत्न यातून देशाची संस्कृती कळत असते. 'गोंधळ', दशावतारी नाटके, तमाशा हे त्यांचे यात्रा–उत्सवाच्या वेळचे आवश्यक विधी असतात. स्त्रियांचे मंगळागौर, नागपंचमी या पूजा प्रसंगी जे खेळ स्त्रिया खेळतात. त्या खेळांना गाण्याची साथ असते. ती गीते प्रसंगानुरुप फेराची, झिम्मा, फुगडी, कोंबडा नाच याशी संबंधीत असतात. किंबहुना त्यांचा आशय वेळ, प्रसंग व मनोभावना हाच असतो. सूर्य उजाडण्यापूर्वी जात्यावरील ओव्या हे तर त्यांच्या श्रमपरिहाराचेच एक साधन आहे. सकाळी पांगुळ, वासूदेव, भराडी येऊन करमणूक करतात. दुपारच्या फावल्या वेळी गावोगावचे गारुडी, कोल्हाटी, कडक लक्ष्मी, डोंबारी येऊन खेळ करतात. वाद्यांची साथ खेळातील हाकारे–पुकारे, संवाद यांचे स्वरुप गद्यपद्यात्मक व ठराविक स्वरुपाचे असते. व्यक्तीला किंवा गावाला काही बाधा झाली असेल तर जे तोडगे, उपाय, मंत्र असतात. ते गद्य–पद्यात्मक, लयबद्ध असतात. तसेच ऋतुंचे स्वागत, पौर्णिमा, देवदेवतांच्या पालख्या मिरवणुक ग्रामदेवतेची उत्सव, नैवेद्य अशा प्रसंगी सामुहिक नृत्य केली जातात. उदा. पंचमी उत्सव, कोळ्यांचा नाच, मिरवणूकीतील खेळ व नाच, रात्री मनोरंजनासाठी तमाशा कलगीतुऱ्याचे फड, लावणी, जलसा, संगीतबारी असे करमणुकीचे खास प्रकार तेही उघड्या मैदानावर केले जातात. यावरुन लोकसाहित्य हे सांस्कृतिक जीवनाशी निगडीत आहे. हे लक्षात येते.

**लोकसाहित्यातील लोकाचारातून घडणारे लोकसंस्कृतीचे स्वरुप :–**

भारतीय–महाराष्ट्रीय समाज जीवनात वर्षाचा प्रारंभ वसंत गौरीच्या स्वागताने त्या स्वागतासाठी सज्ज असलेल्या गुढ्यांनी, रांगोळीने सजवलेल्या अंगणांनी होतो. अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त या दिवशी कऱ्हाची पुजा केली जाते. मग जेष्ठी पौर्णिमेला अक्षय सौभाग्याचे वरदान मिळावे म्हणून वटसावित्रीचे व्रत सुवासिनी निष्ठेने करतात. जेष्ठाचा हात धरुन आलेली वर्षा जेव्हा आषाढाच्या दारी येते तेव्हा धारानृत्यांनी ग्रामीणांची मने उजळून निघतात. मग चातुर्मास सुरु, घरात व्रत वैकल्ये, शेतात भाताची लावणी आषाढाच्या अखेरीस दिव्यांची आवस, समया, निरांजने लखलखीत होतात आणि दुसऱ्या दिवशी श्रावणाचे आगमन होते.

श्रावणात झाडांच्या फांद्यावरुन झुलणाऱ्या झुल्यांबरोबरच ग्रामवधूंची हृदये फुलून जातात. माहेरचा मुरळी येतो नि माहेरच्या वाटा गतिमान होऊ लागतात. सख्या–साजन्यांचा मेळा गोळा होतो. पंचमीची नागपूजा पौर्णिमेचे रक्षाबंधन शुक्रवारच्या जिवती,



Scanned by CamScanner

शनिवारचे मारुती पुढचे तेवणारे कणकेचे दिवे, रविवारची आदित्य राणुबाई, कृष्णाष्टमीचे गोकुळ सारा श्रावणमास असा वाजत–गाजत राहतो. कथा–कहाण्या, पोथी–पुराणे, फेराची गाणी.

भाद्रपदाच्या प्रारंभी गणगौरीचे स्वागत हरतालिका व ऋषीपंचमी ही दोन कडक व्रते शिवासारखा पती लाभावा म्हणून गौरीच्या साक्षीने शिवाची पार्थिवपूजा विविध फुलापालवांनी साजरी केली जाते. कडक उपवास करुन कुमारी स्त्रिया रात्री खेळ–गाण्यात शीण विसरुन जातात. गौरी जेऊ घातल्या, गणपती विसर्जन झाले की, पित्तर पंधरवडा सुरु. पित्तरांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'गण' जेऊ घालायचे. सर्वपित्रीला उरल्या सुरल्या सर्व पितरांचे स्मरण, बैल पोळ्याला उत्साहाने बैल सजवायचे घरोघरीही पाटावर, चौरंगावर मातीच्या बैलांची पूजा होते. दुसऱ्या दिवशी घटस्थापना दुर्गेचे नवरात्र सुरु नऊ दिवसांच्या नऊ–माळा नऊ रात्री उत्साहात नवमीच्या दिवशी होमात बळी दिला जातो आणि विजया दशमीचे सीमोल्लंघन ताशा–वाजंत्रीच्या साथीने होते. पाच दिवसांनी येणाऱ्या पौर्णिमेला जेष्ठापत्यपूजन. ''कापससारखा म्हातारा हो नि हरळीसारखा वेलीजा'' अशा आशीर्वादांनी जेष्ठापत्याचे औक्षण घरोघरी होते.

दिवाळीचे पाचही दिवस दिव्यांच्या नि उत्साहाच्या झगमगाटाने उजळलेले असतात. दिवाळीनंतर देवदिवाळी, संक्रांत आणि मग होळी होळीच्या आधी पौर्णिमेला लाकड गौऱ्या चोरायला मुहूर्त होतो. होळीची पुरणपोळी, धुळवडीची धुळ आणि रंगपंचमीचे रंग हे सारख्याच आनंदाचे विषय सोबत गावाची यात्रा. ग्रामदेवतेचा उत्सव सुगीच्या दिवसात होतो. पारावर दुकाने, पाळणे, रंगीत पोषाख, पारावर जमणे देवाला नवा पोषाख सायंकाळी पुजा, नवसांची दंडवते देवाच्या दारी वाजत गाजत येतात. रात्री पालखीतून देवाचा छबिना निघतो आणि उत्तररात्री पटांगणात तमाशाचा फड, दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा आखाडा, ग्रामदेवतेच्या भक्तींच्या क्षेत्रात छबिना व तमाशात विसंवाद नाही. तमाशामुळे भक्तीला बाधा येत नाही. हे ऋतुचक्रासवे फिरणारे जीवनचक्र यातच लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब दिसते.

माझ्या हातात भरला काटा
सासूबाई म्हणतात– मिरची वाटा
वाटू मी कशी? ''वाटलीच पाहिजे''
किंवा
डोळ्यात गेली खर.... ''भाकरी कर''
गुडघ्याला झाला फोड..... ''लाकडे तोड''
पोटात आली कळ... 'बारीक दळ''

यासारख्या भारुडातून स्त्रीयांचे सासरचे अनुभव व्यक्त झाले आहेत. खानदेशाच्या भुलाबाईच्या गाण्यात ''चला– चला– भुलाबाई आपुल्या घराला... नवरा येतो. समजावायला येथे टाकून दिलेली स्त्री, नवऱ्याच्या प्रेमाला भुकेली स्त्री दिसून येते. स्त्रीचे भावावरील प्रेम, भाऊ नसेल तर चंद्राला ओवाळते. ''तुपात पडली माशी, चांदोमामा राहिला उपाशी'' या गीतात सासूने परवानगी दिल्याशिवाय सून भावाला जेऊ घालू शकत नाही. ''आंब्याच्या सावलीत कोयल बोले राधा, उपाशी गेले दादा.''

अशा स्त्रीगीतातून स्त्रीयांच्या भावना कळतात. निरनिराळ्या देवदेवतांना निरनिराळ्या कारणांसाठी विशेषत: मनोकामना पूर्ण करण्यासाठी नवस केले जातात. जागरण केली जातात. त्यावेळी भारुडे म्हटली जातात. गोंधळ घातले जातात. ''ग अंबे रोडगा वाहीन तुला'' अंगात येण्यावर लोकांचा विश्वास असतो. ते सांगतील ते ते करत असतात.

''माझ्या अंगात आल बरं का
तुम्ही मागे– मागे सरका
आणा लवकर आणा
अठरा बदाम छत्तीस नारळ
पन्नास खारका''

यावर लोक विश्वास ठेवतात आणि त्याप्रमाणे वागतात. यज्ञ करणे, यात्रेला जाणे, पंढरपूरची वारी करणे महत्त्वाचे मानले जाते.'

''पंढरीसी एकवेळ जाशी



Scanned by CamScanner

तरी तू अवघाची सुखरुप होशी'' असे मानले जाते.

पाऊस मागण्याचा विधी–

''दगडाचा देव पाणी मोठा येव'',
''मेघराजा पाणी दे, साळी दाळी पिकू दे''

आजारावर मंत्राचे उपाय करण्याचे विधी –

''मेरी भक्ती गुरु की शक्ती''
''स्फुरो मंत्र ईश्वरी वाचा''

अशा सारख्या मंत्रात सामर्थ्य असते असे मानले जाते. परमार्थिक मंत्र प्रार्थना स्वरुप असतात. त्यांचे प्रयोजन परमार्थिक असते. त्यातून लोक कल्याणकारी भावना प्रगट होते. लौकीक मंत्राचा आणि यंत्राचा उपयोग रोजच जीवनात लौकीक जीवनातील गरजांसाठी केला जातो.

विधीचा उद्देश जीवन सुरक्षित राहण्यासाठी कोणत्या तरी अज्ञान शक्तीला वश करुन घेण्याचा प्रयत्न असतो हे विधी नियमित केले जातात. रोगराई झाल्यास मरीआईचे भगत पोतराज तिला संतुष्ट करण्यासाठी गाणी म्हणतात. ''धोंडा मारी'' चा विधी झाल्यावर संकट, दुष्काळ, रोगराई होत नाही असे मानले जाते. विधीत व्यत्यय आल्यास शाप दिला जातो. साप, विंचू सारखे विषारीप्राणी चावल्यावर मंत्रतंत्राच्या सहाय्याने विष उतरु शकते ही समजूत आहे. नाममंत्री भजने म्हणतात. लहान मुल, नवीन इमारत यांना दृष्टीबाधा होते अशी परंपरागत समजूत आहे. काहीवेळा केरसूनी घेऊन ती बाळावरुन तीन वेळा उतरवतात व मंत्रासारख्या खालील ओळी म्हणतात.

''काळी मांगीण, काळ्या घोड्यावर बसली,
काळ लुगडं नेसली, डाव्या हाती घडा
उजव्या हाती करा, दृष्ट जाय आपुल्या घरा.''

अशा विविध अंगातून आपली संस्कृती व्यक्त होत असते. व्यक्तींचे आयुष्य अल्प असते पण समाज दीर्घायुषी असतो. माणुस आपल्याला मिळालेले भौतिक व वैचारिक ज्ञान पुढच्या पिढीला सुपुर्द करतो. नवीन पिढी त्यात भर घालते.

**सारांश :**

आपल्या संस्कारांवरुन संस्कृती ठरवली जात असते. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात जे वागणे सुसंस्कृत वाटेल त्यालाच संस्कार म्हणता येतील. संस्कार हा आपल्या घरापेक्षा, आपल्या जातीपेक्षा आणि आपल्या धर्मापेक्षा खुप मोठा असतो. परंपरा जपणाऱ्या व्यक्ती समूहापासून समाज निर्माण होत असल्याने समाज आणि लोकसाहित्य परस्परपूरक आहेत. सृष्टीची निर्मिती म्हणजे मनुष्य आणि मनुष्यनिर्मिती म्हणजे समाज याच समाजाने मनुष्याला आपल्या रंगात रंगवून सार्थक समर्थ बनविले अशा या श्रृंखलाबध्द संबंधांचा अभ्यास शास्त्रीय दृष्टीकोनातूनच केल्यास. समाजशास्त्रापर्यंत आपण जाऊन पोहचतो तर सांस्कृतिक दृष्ट्या विचार केला तर लोकसाहित्याप्रत जाऊन पोहचतो. अर्थात लोकसाहित्य समाज व संस्कृती यांची एकत्रित गुंफण आपणास दिसते. त्यावरुन लोकसाहित्यामध्ये समाजव्यवहार आणि सांस्कृतिक परंपरा प्रकट करण्याचे व टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे हे नमूद करता येईल. लोकसाहित्यामध्ये प्राचीनता पुरातनता असते. परंतु ही प्राचीनता केवळ कालवाचक मानून चालणार नाही त्यावर त्या त्या काळातील समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे वर्तमानकाळ समृध्द आणि विकासक्षम होत असतो.

**संदर्भ :**

१) प्रभाकर मांडे, ''लोकसाहित्याचे स्वरुप'', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद– ३, २०१७.
२) शरद व्यवहारे, ''लोकसाहित्य: रंग आणि रेखा'', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९०.
३) शरद व्यवहारे, ''लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह'', प्रतिभा प्रकाशन, पुणे, १९९९.
४) प्राचार्य डॉ. विजय हिरालाल उभाळे, ''समाजाच्या जडण–घडणीत मराठी साहित्याचे योगदान'', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१५.
५) डॉ. विश्वनाथ शिंदे, ''लोकसाहित्यमीमांसा'', भाग– १, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.
६) डॉ. विश्वनाथ शिंदे, ''लोकसाहित्यमीमांसा'', भाग – २, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००६.



Scanned by CamScanner